# जनावरातील सर्पदंश व त्यावरील उपाय

प्रा. के. एल. जगताप
विषय विशेषज्ञ (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र)

डॉ. संजुला व्हि. भावर
विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या)

डॉ. अजय किनखेडकर
कार्यक्रम समन्वयक

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये सापाला देव मानतात. नागाची पूजा आर्चा करतात. काही जमातीचे लोक यावर आपल्या उपजीविकेचे साधन म्हणून पाहतात. सापाला शेतकऱ्याचा मित्र देखील म्हटलेलं आहे. कारण शेतामध्ये शेतीमालाच नुकसान हे उंदीरच जास्त प्रमाणात करत असतात. उंदारांची संख्या हे सापच कमी करतात, कारण सापाच खाद्य म्हणजे उंदीर. "आयत्या बिळात नागोबा" ही म्हण प्रचलित आहे, तशी बरोबरच आहे. कारण सापाला स्वत:च्या संरक्षणासाठी उंदराने स्वत;च्या संरक्षणासाठी केलेले आयतेच बिळ राहण्यास मिळते, तसेच खाद्य देखील मिळण्यास जास्त आटापिटा करावा लागत नाही.

साधारणपणे पावसाळ्याच्या दिवसामध्ये उंदरांची बिळे ही पाण्याने भरली जातात, त्यामुळे ते स्वत:च्या संरक्षणासाठी/आश्रयासाठी इकडे तिकडे फिरत असतात. त्यामध्ये ते जुन्या, पडक्या इमारतीचा, आडबाजूचा जिथे जास्त वर्दळ नाही, अडगळीची बाजू, जनावराचा गोठा, खाचखळगे, कडब्याच्या गंजी, गवताचे गड्डे यांना जवळ करतात. जनावरासाठी पावसाळ्यामध्ये हिरवा चारा देखील मुबलक प्रमाणात असतो. काही ठिकाणी तर चारा खूप वाढून जंगलसदृश्य परिस्थिती निर्माण होते / दाटी होते. हिरवा चारा खाण्याच्या हव्यासापोटी जनावरे गवताच्या दाटीमध्ये जातात. अशा दाटीच्या गवतामध्ये साप मोठ्या प्रमाणात वावरत / फिरत असतात. जनावरे चरत असताना सर्पदंश होतो. त्यामुळे जनावराच्या तोंडाभोवती, मानेखाली, कासेवर व खुराच्या मागील बाजूस सर्पदंशाच्या खुणा आढळून येतात. अशा या गोष्टी जर वेळेवर पाहिल्या नाही तर सर्पदंशाचा मज्जातंतूवर परिणाम होतो व त्यामुळे श्वासोच्छवास बंद होऊन जनावर दगावण्याची शक्यता असते. याचसाठी पशुपालकाने आपापली जनावरे चारून आणल्यास त्यांचे दररोज निरीक्षण हे केलेच पाहिजे.

जगामध्ये सापाच्या एकूण २५०० जाती आहेत. आपल्या भारत देशामध्ये सापाच्या एकूण २७० जाती आढळून येतात. सापाचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास बिनविषारी, निमविषारी व विषारी अशा प्रकारे केले जाते. बिनविषारी साप चावला तर कोणताही धोका होत नाही. निमविषारी साप हे विषारीच असतात. परंतु त्यांच्या चावण्यामुळे जीव जाईल इतका धोका नसतो. तर विषारी साप चावल्यामुळे ते धोकादायक व प्राणघातक असते. महाराष्ट्रात आढळणाऱ्या सापापैकी नाग, मण्यार, घोणस व फुरसे हे विषारी साप तर अजगर, धामिन, कवड्या, हारणटोळ, गवत्या व वाळा हे बिनविषारी साप आहेत.

### जनावरांना सर्पदंश झाल्याची लक्षणे:

- विषारी सापाने चावा घेतल्यास जनावर सैरभैर धावत सुटते.
- चावा घेतलेल्या ठिकाणी दाताचे व्रण आढळून येतात. तो भाग सुजल्यासारखा असून त्यातून रक्त देखील वाहते.
- सर्पदंश तीव्र असल्यास काही मिनिटात जनावर चारा खाणे बंद करते.
- तोंडातून फेस येतो तसेच तोंडातून लाळ गळते.
- डोक्यावर आपटी येते,
- डोळ्याच्या बाहुल्या सुजतात.
- जनावर मान टाकते.
- श्वसनास त्रास होतो.

### सर्पदंशामुळे विषबाधा झाल्यास उपाय:

- सर्पदंश झाल्यावर जनावराच्या शरीरात विष हे रक्तामध्ये मिसळते व ते संपूर्ण शरीरभर पसरण्याची शक्यता असते. डॉक्टरांची मदत घेण्याअगोदर काही घरेलू उपायांनीही सर्पदंशाचा धोका आपणास टाळता येऊ शकतो.
- प्रथम सर्पदंश झालेल्या ठिकाणाच्या वरील बाजूस घट्ट दोरी अथवा पट्टी बांधावी, जेणेकरून विष जनावराच्या शरीरात पसरणार नाही.
- दंश केलेल्या ठिकाणी नवीन ब्लेडच्या मदतीने चिरा घ्याव्यात, पण याची खोली जास्त असू नये. त्यामुळे विष शरीरात न पसरता रक्तप्रवाहाबरोबर शरीराबाहेर निघून जाण्यास मदत होईल.
- जखम धुण्यासाठी स्वच्छ पाणी वापरावे.
- पुरेसा रक्तप्रवाह झाल्यानंतर त्यावर पोटॅशिअम परमॅग्नेट चोळावे. ज्यामुळे रक्तप्रवाह आटोक्यात येईल.

### सर्पदंश टाळण्यासाठी उपाय:

- गोठ्यात तसेच गोठ्याच्या परिसरात उंदरांचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घ्यावी.
- गोठ्यात व गोठ्याच्या परिसरात अडगळ निर्माण करू नये.
- सरपण, गोवऱ्या यांची साठवणूक गोठ्यापासून दूर करावी.
- पावसाळ्यात गोठ्याच्या परिसरात गवतांची वाढ टाळावी.
- घनदाट जंगलात अथवा चराई क्षेत्र / कुराणात जनावरांना चरण्यासाठी घेऊन जाणे टाळावे.

(संपर्क: +९१ ९८८१५३४१४७)

★★★